Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

# सनद - अस्तित्वाला वाचा फुटणाऱ्या पंखाची कविता (मार्क्सवादी दृष्टिकोनातून)

सचिन प्रभाकर देशमुख

नारायण गंगाराम सुर्वे यांचा जन्म 15 ऑक्टोबर 1947 रोजी झाला. मराठी साहित्यातील श्रेष्ठ कवी म्हणून त्यांचा उल्लेख करता येईल. त्यांनी आपल्या कवितेत स्वतःला आलेले अनुभव अभिव्यक्त केले आहे. म्हणून त्यांची कविता दलित आणि मार्क्सवादी दृष्टिकोनातून साकार होते. त्यांचा “ ऐसा गा मी ब्रम्ह “ हा काव्यसंग्रह 1962 झाली प्रकाशीत झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेने अस्पृश्य समाज शिकून जागृत झाला. त्याला स्वातंत्र्य, समता, बंधुता ही जीवन मूल्य समजली, आणि तो आपल्यावर लादलेली हजारो वर्षांची गुलामी झुगारू लागला. स्वअस्तित्व शोधू लागला. याचे वर्णन झाले आहे. तर त्यांचा दुसरा काव्यसंग्रह ‘जाहीरनामा’ 1975 ला प्रकाशित झाला. जन्म आणि मरण यांच्या द्वंद्वाचा खेळ मांडून नवी शहर माणसाला माणसाच्या अलिखित नियमांची जाणीव करून देतात, तिसरा काव्यसंग्रह ‘माझे विद्यापीठ’ 1966 साली प्रकाशित झाला. घरदार नसलेल्या व्यक्तीला फुटपाथवर राहून येणाऱ्या अनुभवांची गाथा यात आली आहे. ‘सनद’ हा कविता संग्रह 1982 साली प्रकाशित झाला. अशा प्रकारची साहित्य निर्मिती नारायण सुर्वे यांनी केली आहे व त्यांच्या साहित्याला कुसुमाग्रज प्रतिष्ठानचा जनस्थान, कबीर, पद्मश्री पुरस्कार प्राप्त झाला आहे.

नारायण सुर्वे यांचा ‘सनद’ हा काव्यसंग्रह 1966 साली ग्रंथाली प्रकाशन, मुंबई यांनी प्रकाशित केला. या कविता संग्रहात एकूण 67 कवितांचा समावेश आहे. घर नसलेल्या व्यक्तीला जेव्हा फुटपाथवर राहून जीवन जगावं लागतं तेव्हा त्याला या जिंदगीचे किती वाईट अनुभव येतात, त्या अनुभवाला एखाद्या कोळशाच्या खाणीत हिरा सापडावा आणि त्यांने सर्वांग पाजळून निघावं,तो सूर्यप्रकाश सर्वांनी द्यावा सत्वाचा, स्व अस्तित्वाचा मी पणाचा शोध घेत यावा म्हणून या शोधनिबंधात नारायण सुर्वे यांच्या ‘सनद’ काव्यसंग्रहातून ‘सनद - अस्तित्वाला वाचा फुटणाऱ्या पंखाची कविता’ या विषयाचा अभ्यास करावयाचा आहे. नारायण सुर्वे दलित कवी बरोबरच मार्क्सवादी कवी म्हणूनही ओळखले जातात कारण माणसाने मांडलेल्या विचार झालेला माणूस म्हणून ओळखले जातात. कार्ल मार्क्स ने .मार्क्स आणि एंगल या दोन्ही मित्राच्या मार्क्सवाढ घडला. कार्लमार्क्स याने 1948 रोजी प्रसिद्ध केलेल्या जाहीरनाम्याला ( The Camunist Manifosto) ही मार्क्सवाद म्हणून ओळखले जाऊ लागले. मार्क्सवादाबाबत हेगेल असे म्हणतो की “विश्वाला एक संरचना असून विरोध विकासातून किंवा द्वंद्वातून त्यात परिवर्तन घडते, परिवर्तन हे विश्वाचे तत्वच आहे. विश्वातील घटकांमधील प्रज्ञा गर्भ किंवा श्रेय गर्भ असतात, त्या विश्व चैतन्याचे अविष्कारच असतात. त्या विकासाच्या दिशेने जाणाऱ्या असतात. भौतिक वस्तू आणि मन असे द्वैत दिसत असली

तरी ते एकात्म आहेत. तत्वज्ञान त्यांची एकता प्रस्थापित करते, सर्व व्यापारच आत्मिक आहेत, जे अस्तित्वात आहे त्या कडून जे अस्तित्वात नाही त्या कडे जाण्यासाठी मानवाची प्रवृत्ती असते असे वाटते."

मार्क्सवादास कारणीभूत ठरलेली घटना म्हणजे रशियन राज्यक्रांती होय. या रशियन राज्यक्रांती मुळे रशियात साम्यवादाचा विकास झाला. रशिया आणि अमेरिका यांच्यामध्ये झालेल्या शीतयुद्धामुळे प्रस्थापितांविरोधात व उपभोक्ता विरोधी मार्क्सवादी विचार उपयुक्त ठरले. त्याची परिणिती 1930 नंतरच्या काळात मराठी समीक्षक के नारायण काळे, लालजी पेंडशे, प्रभाकर पाध्ये, वि.ह.कुलकर्णी, अनंत काणेकर, ह.वी. देसाई यांनी मार्क्सवादी समिक्षेविषयी विश्लेषणात्मक, परिचयात्मक लिखाण केले. तर दुसऱ्या महायुद्धानंतर श्री.अ. डांगे, श्रीराम अत्तदरे, बा.र.सुठनकर, द.का.संत, स.रा.गाडगीळ, श्रीनिवास सरदेसाई, खंडेराव मुळे, यांनी लेखन केले. साहित्यिक दृष्टिकोनातून गं.बा. सरदार, दि.के. बेडेकर, शरच्चंद्र मुक्तिबोध यांनी लिखाण केले. नारायण सुर्वे यांच्या साहित्यातूनही दलित जाणीव मार्क्सवादी दृष्टिकोन अभिव्यक्त झाला आहे म्हणून नारायण सुर्वे यांनी आपल्या साहित्यातून ही सगळी परिस्थिती व्यक्त केली म्हणून त्यांच्या कवितेतून 'सनद- अस्तित्वाला वाचा फुटणाऱ्या पंखाची कविता' या शोधनिबंधाची आवश्यकता आहे.

कामगारांच्या आयुष्यात रोजीरोटीचा प्रश्न दररोज निर्माण होतो. आणि त्यातून घडत जातो त्यांच्या आयुष्याचा इतिहास कवी नारायण सुर्वे म्हणतात,

" रोजी रोटीचा सवाल रोजचाच आहे
कधी फाटका बाहेर कधी फाटका आत आहे
कामगार आहे मी तळपती तलवार आहे
सारस्वतांनो थोडासा गुन्हा करणार आहे" [२]

कवींनी कामगारांचे जीवन जवळून पाहिले,ते स्वतः कामगार म्हणून कॉटन स्पून मध्ये कामाला जात. त्यावेळेस त्यांच्यावर अनेक संकटे यायची, एक निवारले तर दुसरे अजून पुढे यायचे या अनुभवातून मार्ग काढण्यासाठी शिक्षणाशिवाय पर्याय नाही म्हणून आपण शिकले पाहिजे, या अनुभवातून कवी घडले जातात. कारण त्यांना युगांची साथ असते, तुफानाची साथ असते आणि हातात तलवार असते, एकीचे बळ असल्यामुळे कामगारांची लढे यशस्वी होतात. मार्क्सवादात अर्थकारणाला अधिक महत्त्व आहे. त्याचबरोबर बाकीच्या गोष्टीला कमी महत्त्व असले तरी अर्थ कारण म्हणजे आर्थिक पाया जो जीवनात इतर अंगावर नियंत्रण ठेवतो, त्याचे नियमन करत असतो. त्यामुळे जीवनाच्या सर्व घटकांना स्वायत्तता प्राप्त होते. नारायण सुर्वे ची वडील गंगाराम सुर्वे हे गिरणीमध्ये कामगार असल्यामुळे त्यांच्या वाट्याला कामगारांचे जीवन आले आहे. आई-वडिलांच्या आठवणीही त्यांचे मन गहिवरून आले कि ते म्हणतात

"त्याच रात्री आम्ही पायांनी
एकमेकास बिलगुनी
आईची मायाच समजून
घेतली चादर ओढून

आधीचे नव्हतेच काही
आता आईदेखील नाही
अश्रूंना घालीत अडसर
जागत होतो रात्रभर
झालो पुरते कलंदर”

आई मुलांना जशी वाढवत असते तसेच त्यांच्यावर योग्य वयात योग्य संस्कार करीत असते, पण ती निघून गेल्यावर मुलांना कोणाचाच आधार नसतो. मार्क्सवाद हा समग्र जीवनाचा अर्थ लावून पाहणारे तत्वज्ञान आहे. मानवी जीवनात सर्व अंगांचा, सर्व क्षेत्राचा विचार करते. आपल्या सोबत असणाऱ्या व्यक्तीच्या भूमिका घेते. चार्वाक, भगवान बुद्ध, महात्मा फुले, डॉ बाबासाहेब आंबेडकर व कार्ल मार्क्स यांच्या विचारातून सामान्य व्यक्ती जागृत झाला, तो शिकला आणि आपल्या हक्कासाठी, न्यायासाठी झगडू लागला, म्हणून कवि म्हणतात

घालीन मी साऱ्या । ब्रम्हांडास पाणी ।
सुरवीन गाठी । दिव्यात्वांच्या ।

शिक्षणामुळे विश्वातील सत्याचा शोध घेता येतो असे आणि सर्व प्रश्नांची सोडवणूक करता येते असे वाटते. आई-वडिलांनी आपल्या सोबत राहावे, आनंद व्यक्त करावा पण तो क्षण ही त्यांच्या वाट्याला येत नाही म्हणून कवि म्हणतात

‘ बाहेर फटफटते, ते ओले किरण खोलीत फडफडतात
रथचक्रा सारखे पुन्हा पाय कारखान्याकडे वळतात ‘

दिवसभर काम करून आल्यानंतर मुलांच्या चेहऱ्यावरून हात फिरवला की, सर्व दुःख कमी होते, शीन कमी होतो, आणि पुन्हा कामावर जावे लागते हा त्यांचा दिनक्रम ठरलेला असतो कवि म्हणतात

दोन दिवस वाट पाहण्यात गेले ;
दोन दुःखात गेले
हिशोब करतो आहे किती दिवस राहिलेत डोईवर उन्हाळे
शेकडो वेळा चंद्र आला, तारे फुलले रात्र धुंद झाली
भाकरीचा चंद्र शोधण्यातच जिंदगी बरबाद झाली

कामगारांच्या जीवनात दुःख दारिद्र्य हेच भरलेले आहे. त्याच्या आयुष्यात काही दिवस चांगले येतात, पण भांडवलदारांच्या शोषक वृत्ती मुळे ही त्याला पोटाला पोटभर भाकर मिळवण्यासाठी रात्रंदिवस काम करावे लागते. तो प्रत्येक क्षणी दुसऱ्याचा विचार करतो पण त्याचा विचार कोणीही करत नाही. झोतभट्टीत पोलाद आणि शेकावे तसे त्याचे आयुष्य असते. कवि म्हणतात

“आकाशाच्या मुद्रेवर अवलंबून राहिलो नाही
उगीच कुणाला सलाम ठोकणे जमलेच नाही”( स्वतःला शर्यत गेली)

आंबेडकरवाद, मार्क्सवाद हा व्यक्तीला स्वाभिमानाने जगण्यासाठी प्रेरित करत असतो.

शिक्षणामुळे आत्मभान जागृत होते, आणि कोणासमोरही हात पसरण्याची वेळ येत नाही असे वाटते, कवीला नव्या युगाची चाहूल लागते, ते म्हणतात की "विकता विकता त्यांनी सूर्य बाजारात आणला

घर फुंकून विकणारे लोक पाहतच राहिले
अशा वेळी स्वस्थ बसून असेच चालेल
म्हणून मी उठलो
वस्तीच्या बाहेर गेलो
कारखान्यांच्या कानात पुटपुटलो
आता आपणाला कूच करायला हवे (झेप)

शिक्षणाच्या प्रसाराने कामगारांना दिलेल्या अधिकाराने आणि सर्व कामगार एकजूट करू लागले, संघटित होऊ लागले, युनियन चा हा सूर्य, समतेचा हा सूर्य, एकतेचा हा सूर्य कितीही लपवला तरी, किंवा त्याच्यावर कितीही दडपण आणले तरी ते आता भिणारे नाहीत. घराघरात, प्रत्येक कारखान्यातील मजुरास आपल्या हक्काची जाणीव झाली. ते उत्पादनातही आमचा वाटा आहे, श्रम आम्ही वस्तू तयार करतो, आतापर्यंत गहाण राहिलेले हात बंद मुक्त झाले आहेत नवी झेप घेण्यासाठी, स्वतःचे अस्तित्व शोधण्यासाठी, गुलामगिरी झुगारून देण्यासाठी, कारण आमच्या पंखात स्वातंत्र्य, समता, बंधुता व सामाजिक न्याय यांचे बळ संचारले आहे आणि ते आता मुक्त होण्याचीच भाषा करतात. नव्या पिढीला नव्या युगाची भाषा कळते. नारायण सुर्वे यांच्या कविते बाबत ते स्वतः म्हणतात " माणसाविषयी आणि माणसासाठीच लिहिणारे आपण आहोत अशी ही भूमिका मी कधीही विसरत नाही" (प्र. क्रमांक 409) कवींनी स्वतःचे संपूर्ण आयुष्य कामगारातच घालवलेले आहे त्यामुळे त्यांच्यापासून ते दूर जाऊ शकत नाहीत त्यांच्याशी नाळ तोडू शकत नाही. कवि म्हणतात

"लोंढा आजच्या सारखाच वडील कारखान्याकडे
मात्र आजच्यासारखा धाक नसेल
उदंड उत्साह असेल
नवा माणूस जन्माला घालणाऱ्या नवेलीला "
( जेव्हा कधी या वर्षी प्रयोग होतील)

जेव्हा नव्या उमेदीने लोक कारखान्यावर जातील आपापसातील वैरभाव दूर करून तेव्हा सर्वांच्या मनामध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण होईल आणि प्रत्येक आईला आपण जन्माला घालणारा मुलगा हा शोषितांचे, मजुरांचे, श्रमिकांचे, अबला स्त्रियांचे रक्षण करीन असा जन्माला घालावे असे वाटेल म्हणून ती जन्माला येणाऱ्या प्रत्येक मुलाला मानवतावाद शिकवते. याबाबत दिगंबर पाध्ये असे म्हणतात की, सुर्वे यांच्या कवितेने कष्ट करायची या जगाकडे पाहण्याची नवी दृष्टी दिली" (04 प्रकरण क्रमांक 98, 99) याबाबत असे म्हणता येईल की त्यांनी कष्टकऱ्यांच्या जगाचा भावानुभव आपल्या कवितेतून मांडला आहे असे वाटते.

भाषिक विशेष :- शेकडो वेळा चंद्र आला, तारे फुलले, रात्र धुंद झाली, भाकरीचा चंद्र शोधण्यातच जिंदगी बरबाद झाली (दोन दिवस)

प्रतिमा :- तारे, चंद्र, सूर्य, डोळे, रात्र, पाठ, फुले,पऱ्या,वारा, ऋतू, भाकर, ऊन अशा वेगवेगळ्या प्रतिमा त्यांनी काव्यात योजल्या आहेत.

यमक :- नारायण सुर्वे यांच्या बहुतांश कवितेने यमक साधलेले आहे.

" रोजी रोटीचा सवाल रोजचाच आहे,
कधी फाटका बाहेर कधी फाटका आत आहे" (चार शब्द)
दररोज स्वतःला धीर देत जगणे कठीण होत आहे
किती आवरावे आपणच आपणाला, कठीण होत आहे कठीण होत आहे."

नारायण सुर्वे यांच्या कवितेचे भाषिक वेगळेपण सांगत असताना कवितेच्या क्षेत्रात त्यांची कविता वेगळी वाटते, कारण त्यांना आलेले अनुभव हे वाचकाला त्यांची कविता वाचताना येतात. भावभावनांनी त्यांची कविता घडत जाते. साधे सरळपण त्यांच्या कवितेत ओघानेच येते. सुर्वे यांच्या कविता वाचकांशी संवाद करत आहे असे वाटते. त्यांच्या कवितेतील भाषा ही रोजच्या बोलण्यातील आहे असे वाटते. त्यांच्या कवितेत आघात युक्तता येते.

"ना घर होते ना गणगोत, चालेन तेवढी
पायाखालची जमीन होती" (माझे विद्यापीठ)
सुर्वे यांनी प्रेम कविता ही रचल्या आहेत.
"याच वस्तीतून आपले सुख येईल
तोवर तुला मला जागलेच पाहीजे
दारावर येतीलल सोनेरी मनोरथ
तोवर प्रिये वाट पाहिलीच पाहिजे" (तोवर तुला मला)

अशाप्रकारे नारायण सुर्वे यांच्या कवितेची वैशिष्ट्ये सांगता येतील.

**संदर्भ ग्रंथ :-**

१) मिलिंद मालसे – आधुनिक समीक्षा सिद्धांत,
मौज प्रकाशन, मुंबई, प्र.आ.२००७, प्र.क्र.१८९

२) नारायण सुर्वे :- सनद,
ग्रंथाली अभिनव वाचक चळवळ, मुंबई
दु.आ.१९८५, प्र.क्र. १

३) डॉ वसंत बिरादार – आधुनिक मराठी वाड़मयाचा इतिहास,
कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद,
प्र.आ.२०१४,प्र.क्र.४०९

४) दिगंबर पाध्ये :- नारायण सुर्वे यांचीं कविता
लोकवाड़मय गृह, मुंबई,
तिसरी आ. २००८, प्र.क्र.९८,९९